# 3.खंडेनवमी सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस वितरण सोहळा 2022

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा, आणि लोकमंगल संस्थेच्या रौप्य महोत्सवा निमित आयोजित आय.टी.आय. खंडेनवमी उत्सव 4/10/2022 रोजी हा कार्यक्रम कार्यशाळेत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कार्यशाळेतील विविध मशीनरी तसेच साहित्याचे विधिपूरक पूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या टेक्निकल प्रोजेक्टस चे प्रदर्शन आणि बक्षीस वितरण समारंभ आयोजित केला गेला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून **विजयश्री बहूउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या अध्यक्षा तसेच रोटरी क्लब बार्शी च्या अध्यक्षा आणि महिला समुपदेशक केंद्र संचलित,बार्शीच्या अध्यक्षा सौ. विजयश्री पाटील मॅडम** यांची उपस्थिती होती.**लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. वाय.बी. गायकवाड सर** आणि **विजतंत्री निदेशक श्री एस.ए.जाधव सर** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित सौ. विजयश्री पाटील मॅडम यांनी आय.टी.आय मधील विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार, संशोधन तसेच समाज प्रबोधन पर व्याख्यान दिले. तसेच टेक्निकल प्रोजेक्ट प्रदर्शनाचे बक्षीस वितरण कार्यकम त्यांच्या हस्ते पार पडला.

या कार्यक्रमासाठी उपस्थित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे टेक्निकल प्रोजेक्ट प्रदर्शनामध्ये **इलेक्ट्रिक ट्विन फॅन एअर कूलर या प्रोजेक्ट ला प्रथम पारितोषिक** मिळाले. आयन व्हगे,धिरज परीट, अभिषेक चौरे , ऋत्विक तोडकरी या विद्यार्थ्यानी हा प्रोजेक्ट सादर केला. त्याचप्रमाणे **द्वितीय परितोषिक एटोमेटेड स्ट्रीट लाइट** च्या प्रोजेक्टला मिळाले, अमरसिंह गायकवाड,निर्गुण टोणपे,प्रसाद वगरे,सिद्धनाथ पोपळे या विद्यार्थ्यांनी यांनी हा प्रोजेक्ट सादर केला. त्याच बरोबर **तिसरे परितोषिक हँड मेड लो कॉस्ट वेल्डिंग मशीन प्रोजेक्ट विवेक हनुमंत सुभेदार** या विद्यार्थ्याने प्रोजेक्ट बनविला.


Mechanic Motorcycle
Workshop

